# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** परभणी **P.S.(ठाणे):** मोधा **Year (वर्ष):** 2023

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0083 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 11/03/2023 00:49 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 10/03/2023

**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 10/03/2023

**Time From (वेळेपासून):** 17:00 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 17:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 11/03/2023 **Time (वेळ):** 00:37 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 003 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 11/03/2023 00:37 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 02 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पंचायत समिती, परभणी, कार्यालयाचे पहिल्या मजल्यावरील,स्वच्छ भारत मिशन/आरोग्य

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** अभय अनिलराव देशमुख

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1994 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पेडगांव ता परभणी,मोधा,परभणी,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | सदस्य ग्राम पंचायत पेडगांव,पेडगांव ता परभणी,मोधा,परभणी,महाराष्ट्र,भारत |

**(I) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9309935309

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | राहुल अंगदराव राख | | | 1. आनंद गस एजन्सीचे मागे,, अंबाजोगाई जि बीड,मोधा,परभणी,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 7000/रू 500/दराच्य 14नोटा. | 7,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 7,000.00

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 10/03/2023मी अभय अनिलराव देशमुख वय 29 वर्ष व्यवसाय शेती व सदस्य ग्राम पंचायत पेडगांव ता. परभणी रा. पेडगांव ता. जि. परभणी मो.नं. 9309935309फिर्याद देतो कि, मी वरील ठिकाणचा राहणारा असुन माझा भाऊ वय 32 वर्ष, व्यवसाय शेती रा. पेडगांव ता. जि. परभणी यांचे पेडगांव शिवारात गट क्रमांक 457 मध्ये एक हेक्टर शेती असुन त्याकरीता महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत सिंचन विहीर फेब्रुवारी 2023 मध्ये मंजुर झाली आहे. सदर विहीरीचे काम सुरु करण्याकरीता वर्क ऑर्डर घेण्यासाठी मी व माझा भाउ असे मिळुन दिनांक 06/03/2023 रोजी पंचायत समिती परभणी येथे गेलो असता पंचायत समिती परभणी येथील ए.पी.ओ. श्री राख हे सिंचन विहरीची वर्क ऑर्डर मिळवुन देण्यासाठी आम्हाला 5,000/- रुपयाची लाचेची मागणी केली असल्याने मी अन्टी करप्शन ब्युरो, परभणी येथे आज दिनांक 10/03/2023 रोजी तक्रार देवुन त्यासोबत 5000/- रुपये जमा केले.मी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस निरीक्षक श्री वाघमारे अ◌ेसीबी, परभणी यांनी वनक्षेत्र अधिकारी, परभणी यांचे कार्यालयातुन दोन पंच नामे 1) श्री कृष्णा महादेव थोरे वय 33 वर्ष व्यवसाय - नोकरी वनपाल, वनपरिक्षेत्र कार्यालय, परभणी रा. व्यंकटेश नगर, परभणी 2) श्री रामभाउ बाबुराव सोनुळे वय 52 वर्ष व्यवसाय - नोकरी वनमजुर, वनपरिक्षेत्र कार्यालय, परभणी रा. डोंगरतळा ता. जिंतुर जि. परभणी यांना अन्टी करप्शन ब्युरो परभणी येथे बोलावुन घेवुन त्यांची व माझी ओळख करून देवुन मी माझी तक्रार पंचांना तोंडी कथन केली. त्यानंतर पोनि श्री वाघमारे यांनी माझी हस्तलिखीत तक्रार पंचांना वाचण्यास दिली. दोन्ही पंचानी माझी तक्रार वाचून त्यावर पोनि श्री वाघमारे व पंचांनी सहया केल्या आहेत.त्यानंतर पडताळणी कार्यवाही दरम्यान माझ्याकडे व्हाईस रेकर्डर चालु करुन देवुन मला व पंच क्र. 1 थोरे यांना माझ्या युनिकर्न कंपनीची मोटारसायकल क्रमांक एमएच 22-बीए-1360 ने पंचायत समिती, परभणी येथील एपीओ राख यांची भेट घेण्यासाठी पाठविण्यात आले. पंचायत समिती, परभणी येथे माझी एपीओ राख यांचेसोबत पंच क्र 1 श्री थोरे यांचेसह भेट झाली. भेटी दरम्यान एपीओ श्री राख यांनी माझा भाऊ विकास अनिलराव देशमुख यांचे सिंचन विहीरीचे काम सुरु करण्यासाठी वर्क ऑर्डर मिळवुन देण्याबाबत चर्चा झाली. चर्चेदरम्यान एपीओ श्री राख यांनी मला पंच क्र 1 श्री थोरे यांचे समक्ष 7,000/- रुपये लाचेची मागणी केली व लाच रक्कम घेवून येण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच क्र 1 थोरे असे अन्टी करप्षन ब्युरो, परभणी येथे परत आलो व पोनि श्री वाघमारे साहेब यांना पडताळणी कार्यवाही दरम्यान घडलेल्या घटनाक्रमाबाबत माहिती दिली. पोनि वाघमारे यांनी माझ्या व दोन्ही पंचांसमक्ष व्हाईस रेकर्डर मधील माझे व एपीओ राख यांचे भेटीदरम्यान रेकर्डीग झालेले संभाषण ऐकले. त्यात एपीओ राख यांनी मला माझे भाऊ विकास अनिलराव देशमुख याचे नावावर असलेल्या शेतातील सिंचन विहीरीचे काम सुरु करण्यासाठी वर्क ऑर्डरच्या मिळवुन देण्याच्या कामासाठी 7000/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यावरुन एपीओ राख यांचेवर सापळा कार्यवाही आजमाविण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.मी माझ्या तक्रारीसोबत 5000/- रुपये जमा केले होते. पडताळणी कार्यवाही दरम्यान एपीओ राख

यांनी मला 7000/- रुपये लाचमागणी केली असल्याने मी माझ्या जवळील 2000/- रुपये पोनि श्री वाघमारे साहेब यांचेकडे जमा केली. त्यानंतर पोनि श्री वाघमारे साहेब यांचे सुचनेनुसार अन्टी करप्शन ब्युरो, परभणी येथे सापळा पुर्व व सापळा कार्यवाहीस सुरूवात केली. सापळापुर्व व सापळा कार्यवाही दरम्यान त्यांनी मला, पंचांना व सापळा पथकास प्रत्येकाला त्यांचे कामाबाबत सुचना दिल्या. त्यानंतर पोनि श्री वाघमारे साहेब यांचे सुचनेनुसार पोशि/अतुल कदम यांनी मला व पंचाना अंथ्रसिन पावडर व अल्ट्राव्हायोलेट लम्पचे गुणधर्म व वापरा बाबत माहिती देवुन प्रात्यक्षीक करून दाखवुन मी जमा केलेल्या 7000/- रुपये ( ज्यामध्ये 5,00/- रू दराच्या 14 भारतीय चलनी नोटांना ) अन्था○रसीन पावडर लावून माझे अंगावरील शर्टचे डाव्या बाजूचे खिशात व्यवस्थीत ठेवून दिली. त्यानंतर मी व पंच क्र. 1 थोरे असे आम्ही एपीओ राख यांना लाचेची रक्कम देण्यासाठी व्हाईस रेकर्डरसह माझ्या मोटार सायकलनें पंचायत समिती, परभणी कार्यालयाकडे निघालो. आमचे पाठोपाठ अन्टी करप्शन ब्युरो, परभणी येथील सापळा पथक शासकीय वाहनाने रवाना झाले. मी व पंच क्र 1 श्री थोरे असे पंचायत समिती, परभणी येथे येवुन एपीओ श्री राख यांचे कार्यालयात त्यांची भेट घेतली. तेथे पंच क्र 1 थोरे यांचे समक्ष त्यांचेत व माझ्यात सिंचन विहीरीचे वर्क ऑर्डरचे कामासंबंधाने चर्चा झाली. त्यानंतर त्यांनी मला लाच रक्कम स्विकारण्याचे उद्देशाने त्यांचे कार्यालयातील पंचायत समिती, परभणी कार्यालयाचे पहिल्या मजल्यावरील स्वच्छ भारत मिशन/आरोग्य विभागाचे बाजुस असलेल्या मोकळया जागेमध्ये नेले. तेथे त्यांनी मला माझ्या भावाच्या सिंचन विहीरीचे वर्क ऑर्डरचे साठी पंच क्रमांक 1 थोरे यांचे समक्ष लाचमागणी पडताळणी दरम्यान मागणी केलेली 7000/- रुपये लाच रक्कम 17:00 वाजता स्विकारल्याने पंच क्रमांक 1 थोरे यांनी लाच रक्कम स्विकारल्याचा पुर्वनियोजित इशारा केल्याने सापळा पथकाने एपीओ श्री राख यांना लाचेच्या रकमेसह ताब्यात घेतले. त्यानंतर सापळा पथकाने माझ्याजवळील व्हाईस रेकर्डर 17:02 वाजता काढुन बंद केले. सदर कार्यवाहीचा सविस्तर सापळा पंचनामा करण्यात आला आहे.श्री राहुल अंगदराव राख वय 35 वर्ष व्यवसाय-सहायक कार्यक्रम अधिकारी ( एपीओ-कंत्राटी ), पंचायत समिती, परभणी रा. आनंद गस एजन्सीचे मागे, अंबाजोगाई जि. बीड यांनी पंचायत समिती, परभणी येथे माझा भाऊ विकास अनिलराव देशमुख यांचे शेतासाठी मंजुर झालेली विहीरीचे काम सुरु करण्यासाठी वर्क ऑर्डरच्या कामासाठी मला पंच क्रमांक 1 थोरे यांचे समक्ष दिनांक 10/03/2023 रोजी 7000/- रुपये लाचेची मागणी केली. त्यानंतर करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान पंचायत समिती, परभणी कार्यालयाचे पहिल्या मजल्यावरील स्वच्छ भारत मिशन/आरोग्य विभागाचे बाजुस असलेल्या मोकळया जागेत राहुल अंगदराव राख वय 35 वर्ष व्यवसाय-सहायक कार्यक्रम अधिकारी ( एपीओ-कंत्राटी ), पंचायत समिती, परभणी यांनी पंच क्रमांक 1 थोरे यांचे समक्ष माझेकडुन 7000/- रुपये लाचेची रक्कम स्वतः साठी स्विकारली. म्हणुन माझी सहायक कार्यक्रम अधिकारी राहुल अंगदराव राख यांचे विरूध्द कायदेशिर फिर्याद आहे. माझी फिर्याद माझे सांगणेप्रमाणे संगणकावर मराठीत टंकलिखीत केली. त्याची प्रिंट काढून मला वाचावयास दिली ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे. समक्ष फिर्याद दिली सही

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** subhash lachamanna anmulwar(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**
**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Deshmukh

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
नवा मोंढा पोलीस स्टेशन परभणी

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): subhash lachamanna anmulw
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):